
Impact Factor - 6.8
ISSN- 0474-9030

International Multidisciplinary UGC CARE Listed Journal for Research Publication

# OUR HERITAGE

PEER REVIEWED [REFEREED] INDEXED
UGC CARE LIST GROUP - B RESEARCH JOURNAL
VOL- 68, ISSUE-35, FEBRUARY -2020:
SPECIAL ISSUE ON MULTIDISCIPLINARY STUDIES



# GENDER EQUALITY AND WOMEN EMPOWERMENT

Chief Editor
**Dr. Ansari Md. Haroon Md. Ramzan**
J.A.T Arts, Science & Commerce College
[For Women], Malegaon, Nashik.

Executive Editor
**Dr. Lodhi Kaniz Fatma Niyaz Ahmad**

Associate Editor
**Dr. Salma Ab. Sattar**

Scanned with OKEN Scanner

| | | | |
|---|---|---|---|
| 18 | गांधीजी आणि महिला सबलीकरण | प्रा. डॉ. मीनाक्षी पाटील<br>सहाय्यक प्राध्यापक, महाराजा सयाजीराव गायकवाड महाविद्यालय मालेगांव कॅम्प, मालेगांव, जि. नाशिक. | 76-79 |
| 19 | महिला सशक्तिकरण आणि देशाची आर्थिक प्रगती | डॉ. बी. एम. सोनवणे<br>सहाय्यक प्राध्यापक अर्थशास्त्र विभाग म.स.गा. महाविद्यालय मालेगांव कॅम्प ता. मालेगांव (नाशिक) | 80-84 |
| 20 | भारतीय स्त्री–स्थितीचा ऐतिहासिक अभ्यास : वेदकाळ ते अठरावे षतक | श्री. विलास आत्माराम देऊलकर,<br>सहयोगी प्राध्यापक, इतिहास बॅ. बाळासाहेब खर्डेकर कॉलेज, वेंगुर्ला, ता. वेंगुर्ला, जि. सिंधुदुर्ग, | 85-89 |
| 21 | भारतातील महिला सक्षमीकरणाचे अध्ययन | डॉ.डी.एन.सोनवणे<br>अर्थशास्त्र विभाग प्रमुख<br>कर्मवीर भाऊसाहेब हिरे कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय निमगांव, मालेगाव | 90-95 |
| 22 | भारतीय संविधानातील महिलांचे राजकीय स्थान व वस्तूस्थिती | प्रा. अंकुश गंगाराम सुर्यवंशी<br>विभाग प्रमुख, राज्यशास्त्र विभाग कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, सात्रळ | 96-99 |
| 23 | भारतातील स्त्रीवादी दृष्टीकोन आणि बदलते प्रवाह | प्रा. विलास नाबदे,<br>सहा.प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग, अहमदनगर महाविदयालय, अहमदनगर | 100-104 |
| 24 | महिलांना संरक्षण देणारे कायदे : एक चिकित्सक अभ्यास | प्रा. डि. झेड. साळवे<br>सहाय्यक प्राध्यापक (इतिहास) एस.पी.एच. महिला महाविद्यालय मालेगाव | 105-109 |
| 25 | भारतातील स्त्रीवादी चळवळींचा आढावा | डॉ. सुनील जे.<br>कवडेराज्यशास्त्र विभागप्रमुख अहमदनगर महाविदयालय अहमदनगर. | 110-116 |
| 26 | भारतातील स्त्री मुक्तीची चळवळ पुरस्कार करणारे समाजसुधारक | प्रा.कानवडे जी.बी.<br>राज्यशास्त्र विभाग प्रमुख<br>रमेश फिरोदिया कला विज्ञान वाणिज्य महाविद्यालय साकुर ता.संगमनेर, जि.अ.नगर | 117-119 |


Scanned with OKEN Scanner

# भारतातील महिला सक्षमीकरणाचे अध्ययन

**डॉ.डी.एन.सोनवणे**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख
कर्मवीर भाऊसाहेब हिरे कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय निमगांव, मालेगाव,जि.-नाशिक

**गोषवारा :** निसर्गत: स्री - पुरुष यांच्यामध्ये लिंग हा एकमेव भेद असून अन्य बाबतीत दोन्ही समान आहेत. मात्र पुरुषप्रधान व्यवस्था आणि सांस्कृतिक भेद यामुळे महिलांना विकासाच्या प्रवाहातून जाणीवपूर्वक दूर ठेवण्यात आले. आर्थिक व सामाजिक बाबतीत दुर्बलतेच्या दुष्टचक्रात पिढ्यानपिढ्या अडकून पडलेल्या महिलांना विषमतेची किंमत प्रत्येक क्षेत्रात मोजावी लागली. माणूस म्हणून असणाऱ्या स्थान निर्देशकांत मागे पडली. युनोच्या HDI (2019) अहवालानुसार 189 देशात भारतात महिलांचा लिंगभेद विषमता व लिंगभाव विकास निर्देशांक अनुक्रमे १२२ व १२९ व्या स्थानावर आहे. स्वतःच्या क्षमतांना ओळखून त्या क्षमतांचा विकास घडून आणण्यासाठी केलेले प्रयत्न म्हणजे महिला सबलीकरण. महिलांच्या सक्षमीकरणासाठी भारतीय राज्यघटनेत महिलांना समान अधिकार प्रदान केलेले असून भारत सरकारच्या वतीने लोककल्याणकारी राज्य प्रणाली स्वीकारून महिलांना समान संधी, अधिकार देण्यासाठी स्री - पुरुष समानता कायदा, समान वेतन कायदा, १९९० चा राष्ट्रीय महिला कायदा, १९९२ मधील राष्ट्रीय महिला आयोगाची स्थापना, १९९५ चे स्वतंत्र महिला धोरण, २००५-०६ पासूनचे लिंगभाव अंदाजपत्रक हे महिला सबलीकरणाच्या वाटचालीतील सुवर्ण स्थळे आहेत. यामुळे महिला सक्षमीकरणाचे प्रयत्न काही प्रमाणात यशस्वी झालेले दिसतात. मात्र हे प्रयत्न वरवर यशस्वी झालेले असले तरी अंतरंगात महिलांचे माणूस म्हणून सक्षमीकरण घडून आणण्यात फारसे यशस्वी झालेले नाहीत.

**सूचक शब्द:-** सक्षमीकरण, महिला सक्षमीकरण, आर्थिक सक्षमीकरण, सामाजिक सक्षमीकरण.

**प्रस्तावना:** जागतिक स्तरावर देशाचा आर्थिक व सामाजिक विकास घडून आणण्यात महिलांची भूमिका अत्यंत महत्त्वपूर्ण मानली जाते. कारण एकूण लोकसंख्येत ५०% अर्थात अर्धे जग महिलांचे आहे. निसर्गाने स्री - पुरुष समानता प्रदान केलेली आहे. उत्क्रांतीच्या कित्येक हजार वर्षाच्या काळात स्री_- पुरुष समानता होती. प्राचीन काळात महिला पुरुषांच्या बरोबरीने आर्थिक व सामाजिक क्षेत्रात कार्य करीत होत्या. पशुपालन, शेती व इतर क्षेत्रात नवीन गोष्टींचा श्रीगणेशा महिलांनीच केला. भारतात वैदिक काळात समाजव्यवस्थेत पुरुषांच्या बरोबरीने संपत्ती, शिक्षण, राजकारण व धर्म इत्यादी बाबतीत समान अधिकार होते. मात्र उत्तर वैदिक काळात प्रामुख्याने १६ ते १८ व्या शतकाच्या मध्ययुगीन काळापासून महिलांची स्थिती व स्थानात कमालीची घसरण झाली. पुरुषप्रधान संस्कृतीचे वर्चस्व वाढून महिलांना धर्म, संस्कृती, शिक्षण, संपत्ती, कौटुंबिक व सामाजिक हस्तक्षेपापासून वंचित ठेवून दुय्यम स्थान प्रदान करण्यात आले. सक्षमीकरण हा शब्द सामर्थ्य या शब्दापासून बनलेला आहे. त्यामुळे महिलांना शक्तिशाली, सामर्थ्यवान, निर्णयक्षम, कृतीशील व धीट बनविण्याची प्रक्रिया म्हणजे महिला सक्षमीकरण. महिलांना आर्थिक सामाजिक दृष्ट्या सक्षम बनवणे ही काळाची गरज आहे. ही काळाची पावले ओळखून भारत सरकारने १९७० च्या दशकात


Copyright© 2020

Scanned with OKEN Scanner

महिला कल्याण, १९८० च्या दशकात महिला विकास, १९९० च्या दशकापासून समान अधिकार देण्याच्या उद्देशाने अनेक कायदे करून अनेक योजना कार्यान्वीत केल्या. समाजसुधारक, महिला संघटना, स्वयंसेवी संघटना यांच्या प्रयत्नामुळे महिलांच्या आर्थिक सामाजिक राजकीय पातळीवर प्रतिनिधित्व व सहभाग वाढीस लागला. प्रस्तुत शोधनिबंध द्वारे भारतातील महिलांचे सक्षमीकरण, सक्षमीकरणाची आवश्यकता, महिला सक्षमीकरणाचे प्रयत्न, सक्षमीकरणाचे प्रभाव व महिलांची सामाजिक, आर्थिक, राजकीय स्थिती विषयक अध्ययन मांडण्यात आलेले आहे.

❖ **शोधनिबंधांचे उद्दिष्टे:-**

i. महिला सक्षमीकरण विषयक माहिती मिळविणे.
ii. भारतातील महिलांची स्थिती जाणून घेणे.
iii. भारतातील महिला सक्षमीकरण प्रयत्नांचा आढावा घेणे.
iv. भारतातील महिला सक्षमीकरण प्रयत्नांचा प्रभावाचा आढावा मांडणे.

❖ **संशोधन प्रणाली:-** भारतातील महिला सक्षमीकरणाचे अध्ययन या प्रस्तुत शोधनिबंधासाठी दुय्यम तथ्य संकलन साधनांचा वापर करण्यात आलेला आहे. संदर्भग्रंथ, माहिती पुस्तके, युनोचा अहवाल, भारत सरकारच्या मानव संसाधन विकास मंत्रालयाचा अहवाल, नियतकालिके, शोधनिबंध, वेबसाइट, वेब पेजेस यासारख्या साधनांचा वापर करून माहिती संकलन करून माहितीची योग्य मांडणी करण्यात आलेली आहे.

❖ **महिला सक्षमीकरण :-**

➢ व्हेनेसा ग्रिफेन (१९८७), स्रियांच्या अंगी निर्णय घेण्याची नियंत्रण करण्याची मतप्रदर्शन करण्याची आर्थिक व्यवहार करण्याची क्षमता व आवड वृद्धिंगत होणे.
➢ बाटलीवाला (१९९४) यांच्या मते, स्वतःच्या क्षमता ओळखून त्या क्षमतांचा विकास घडून आणण्यासाठी महिलांनी केलेले प्रयत्न.
➢ जागतिक बँकेनुसार, महिलांना आपली पसंती ठरवण्याची पसंती इष्ट कृतीमध्ये आणि फलप्राप्तीमध्ये उतरविण्याची क्षमता वाढवणेची क्रिया.
➢ कबीर (१९९४), भौतिक, आर्थिक, बौद्धिक व वैचारिक घटकांवर महिलांचे नियंत्रण वाढणे म्हणजे महिला सक्षमीकरण.

❖ **महिला सक्षमीकरणाची गरज :-**

भारतात प्राचीन काळात वेद पुराणानुसार संपत्तीची देवता म्हणून लक्ष्मी, विद्येची देवता म्हणून सरस्वती, शक्तीची देवता म्हणून दुर्गा स्वरुपात महिलांना मान - सन्मान होता. महिलांना पुरुषांच्या बरोबरीने सर्व क्षेत्रात स्थान होते. महिलांचे सक्षमीकरण महत्त्वाचे मानले जात होते. परंतु वर्तमान काळात महिलांची आर्थिक, सामाजिक, राजकीय स्थिती निकृष्ट स्वरूपाची आहे. आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक विकासासाठी, नैसर्गिक साधनांचा पर्याप्त वापर करण्यासाठी, निरंतर विकास घडून आणण्यासाठी महिला सक्षमीकरणाची गरज आहे. आंतरराष्ट्रीय मुद्रा कोश अहवालानुसार (२०१९) भारताच्या जीडीपीमध्ये महिलांचा सहभाग १७%


Copyright© 2020
Scanned with OKEN Scanner

वरून २७% पर्यंत वाढविण्यासाठी महिला सक्षमीकरण गरजेचे आहे. जेनी व्हावले (2020) यांच्या मते, महिला पृथ्वीच्या संरक्षणात महत्त्वाची भूमिका बजाऊ शकतात. युनोच्या विकासातील महिलांची भूमिका सर्व्हे (२०१४) नुसार महिला सक्षमीकरण आणि आर्थिक, सामाजिक, पर्यावरणीय शाश्वत विकास यांचा जवळचा सहसंबंध आहे.

❖ **महिला सक्षमीकरणाचे मार्ग:-**

i. महिलांच्या ज्ञानाच्या कक्षा रुंदावण्यासाठी स्त्री शिक्षणात वाढ.
ii. आर्थिक गरजा पूर्ततेसाठी स्वयं रोजगार उपलब्धता.
iii. मूलभूत गरजांची पूर्तता.
iv. महिलांचा कौटुंबिक दर्जा उंचावणे.
v. महिलांमध्ये आत्मसन्मान व आदर निर्माण करणे.
vi. महिलांचा सामाजिक वावर वाढविणे.
vii. महिलांमध्ये निर्णय क्षमता वाढणे.
viii. पुरुषांचा महिला विषयक दृष्टिकोन बदलणे.

❖ **महिला सक्षमीकरणाचे प्रयत्न**

महिलांच्या सक्षमीकरणासाठी भारतात स्वातंत्र्योत्तर काळात शासकीय पातळीवर प्रयत्न करण्यात आले.

❖ वैधानिक व्यवस्था :- भारतीय राज्यघटनेनुसार महिलांना पुरुषांच्या समान दर्जा आहे.
❖ कायदेशीर समानता :- राज्यघटना कलम १४ नुसार, प्रत्येक स्री-पुरुष कायद्यापुढे समान आहेत. कलम १५ नुसार, धर्म वंश जात लिंग बाबतीत विषमतेचा अंत.

❖ **महिला सबलीकरणाचे कायदे**

i. हिंदू विवाह कायदा-१९५५
ii. हिंदू वारस हक्क कायदा-१९५६
iii. समान पारिश्रमिक अधिनियम-१९७६
iv. बालविवाह प्रतिबंधक कायदा-१९७६
v. सती प्रतिबंधक कायदा-१९७७
vi. कौटुंबिक न्यायालय कायदा-१९८४
vii. वेश्यावृत्ती निवारा कायदा-१९८७
viii. अश्लीलता विरोधी कायदा-१९८७
ix. लिंगनिदान प्रतिबंधक कायदा-१९९४
x. कौटुंबिक हिंसाचार कायदा-२००५

❖ **महिला विकास व सक्षमीकरण योजना**

i. महिला प्रशिक्षण योजना-१९८९
ii. राष्ट्रीय महिला आयोग-१९९०


Copyright© 2020

Scanned with OKEN Scanner

iii. माता व बाल स्वास्थ योजना-१९९२
iv. राष्ट्रीय महिला कोश-१९९३
v. राष्ट्रीय मातृत्व योजना-१९९५
vi. इंदिरा महिला योजना-१९९५
vii. ग्रामीण महिला विकास योजना-१९९६
viii. राजराजेश्वरी विमा योजना-१९९७
ix. बालिका समृद्धी योजना-१९९७
x. डाकवा योजना-१९९७
xi. महिला उद्योजकता विकास योजना-१९९७
xii. स्वयंसिद्धा योजना-१९९७
xiii. राष्ट्रीय महिला धोरण-२०१४

❖ महिलांसाठी उत्सव

i. महिला दिवस- ८ मार्च
ii. महिला सप्ताह- १ ते ८ मार्च
iii. महिला वर्ष- १९७५
iv. महिला दशक-१९७५ ते १९८५
v. महिला सक्षमीकरण वर्ष- २००१

❖ **महिलांची आर्थिक स्थिती**

i. जगातील सर्व देशात आर्थिक दृष्टया दुर्बल समूहामध्ये कुटुंबाच्या मूलभूत गरजा भागविण्याची जबाबदारी महिलांकडे असते. कुटुंब पातळीवर जेव्हा पैसा कमी पडतो. तेव्हा पहिली कुऱ्हाड कोसळते ती मुली आणि महिलांवर तसेच बहुसंख्य महिला चूल आणि मूल या कार्यामध्ये अडकून असतात.
ii. २००१ च्या जनगणनेनुसार शहरी भागात ११.५०% व ग्रामीण भागात ३१.८०% महिलांना रोजगार मिळतो. आणि मिळणाऱ्या रोजगारात ८०% रोजगार हा प्राथमिक क्षेत्रात मिळतो.
iii. महिलांना मिळणारे वेतन पुरुषांपेक्षा ३/४ ने कमी असते.
iv. आयएओच्या सर्वेनुसार दारिद्र रेषेखालील व्यक्तींपैकी ७०% महिला आहेत.
v. भारतात एकूण संपत्तीपैकी फक्त १०% संपत्तीत व १०% उत्पादनात महिलांचा सहभाग आणि हिस्सा आहे.
vi. आंतरराष्ट्रीय मुद्रा कोष नुसार भारतात जीडीपीमध्ये महिलांचे योगदान फक्त १७% आहे.
vii. वर्ल्ड इकोनॉमिक फोरम २०२०च्या अहवालानुसार भारतात फक्त ३५.४% महिलांना आर्थिक संधी मिळतात.

❖ **महिलांची सामाजिक स्थिती**

i. कोणतेही समाजात सामाजिक व सर्वांगीण विकासासाठी महिलांना पुरुषांच्या बरोबरीचे स्थान मिळणे अत्यावश्यक असते. परंतु भारतीय समाजव्यवस्थेत महिलांना दुय्यम स्थान दिले जाते.


Copyright© 2020
Scanned with OKEN Scanner

ii. स्माईल फाऊंडेशनच्या २०१९च्या अहवालानुसार भारतात १ मिलियन मुलांना त्यापैकी ५७% मुलींना आर्थिक अडचणींमुळे शाळा सोडावी लागते.

iii. युनिसेफ अहवाल (२०१९) नुसार भारतात प्रतिवर्षी १/३ मुलींचा जन्माच्या नंतर पहिल्याच वर्षी मृत्यू होतो. तर १ लाखांपेक्षा अधिक माता कुपोषणामुळे गर्भधारणेच्या काळात मृत्यू पावतात.

iv. युनिसेफ नुसार जगभरात स्त्री-पुरुष प्रमाण सरासरीने १०००:१०५० आहे मात्र भारतात च्या जनगनेनुसार हे प्रमाण १०००:९२ इतके कमी आहे.

v. मानव संसाधन विकास मंत्रालयाच्या बाल व महिला विकास अहवालानुसार भारतात प्रत्येक २६ मिनिटाला १ गैरप्रकार, ५१ मिनिटात एक विनयभंग, ५४ मिनिटात एक बलात्कार तर १०२ मिनिटांत एक हुंडाबळी घडून येतो.

vi. कौटुंबिक पातळीवर ४०% महिला कौटुंबिक हिंसाचाराचा बळी ठरत आहेत.

vii. युनोच्या (२०१९) अहवालानुसार स्त्री-पुरुष समानतेबाबत भारत १८८ देशात १२२ व्या क्रमांकावर आहे.

❖ **महिलांची राजकीय स्थिती**

वर्ल्ड इकॉनॉमिक फोरम (२०२०) अहवालानुसार जागतिक लिंगभाव तफावत निर्देशांकात भारत १५३ देशात ११२ व्या स्थानावर आहे.तर २०१८ मध्ये १०८ व्या स्थानावर होता. संसदेत फक्त १४.४% महिलांना व कॅबिनेट २३% मध्ये महिलांचा सहभाग असून ६९ वा क्रमांक आहे.

❖ **महिला सक्षमीकरण प्रयत्नांचा प्रभाव**

भारतात महिलांच्या सक्षमीकरणासाठी अनेक प्रकारचे प्रयत्न झाली त्याचा सक्षमीकरणावर प्रभाव पडून मिळालेली फलश्रुती.

**महिला सक्षमीकरण प्रयत्नांचा प्रभाव**

| अ.न. | क्षेत्र | १९५१ | २००१ | १९१९ |
|---|---|---|---|---|
| १ | आयुर्मान (सरासरी वर्ष) | ३१.६ | ६६ | ६९ |
| २ | जन्मदर (दरहजारी) | ३९.३ | २७ | १७.६ |
| ३ | मृत्यूदर (दरहजारी) | २९.३ | ९.१ | ७.२ |
| ४ | साक्षरता दर (शेकडा) | ८.८६ | ५४.१६ | ५६.०८ |
| ५ | महिला सहभाग दर | १४.२२ | २३.५ | २४.८ |
| ६ | राजकीय प्रतिनिधित्व (संसद) | ७.३१ | ९.५ | १४.४ |
| ७ | स्त्री - पुरुष प्रमाण (दरहजारी) | ९३३ | ९४० | ९३० |

स्रोत :- गुप्ता कलेश: २००५, जनगणना भारत सरकार: १९५१,२००१

i. भारतात सर्वव्यापी आरोग्य सेवा राज्य व संघराज्यक्षेत्र यांच्याकडून पुरविले जाते. लोकांचे आरोग्य सुधारणे ही घटनेनुसार राज्याची जबाबदारी आहे. १९८३ व २००२ मध्ये राष्ट्रीय आरोग्य धोरण स्वीकारले त्यामुळे आरोग्य सोयीत वाढ होऊन महिलांच्या सरासरी आयुष्यमान दुपटीपेक्षा अधिक वाढ झाली आहे.

ii. भारतीय संविधान कलम २१ अ अंतर्गत ६ ते १४ वयोगटातील बालकांसाठी मोफत व सक्तीचे शिक्षण तरतुदीमुळे १ एप्रिल २०१० रोजी शिक्षण हा मूलभूत हक्क म्हणून लागू झाल्यामुळे महिलांच्या शिक्षणाचा टक्का ५८.०८% पर्यंत वाढला.


Copyright© 2020
Scanned with OKEN Scanner

iii. भारतातील १९७६ व २००० चे लोकसंख्या विषयक धोरणाच्या अंमलबजावणीतून महिलांचा जनन व मृत्यूदर दोन्हीही कमी झाले आहेत. मात्र दर हजारी पुरुषांमागे स्त्रियांचे प्रमाण वाढविण्यात यश मिळाले नाही.

iv. ग्रामीण स्तरावर महिलांचे सक्षमीकरण करण्यासाठी घटनेच्या २४३ व्या कलमात सुधारणा करण्यासाठी ७३वी घटना दुरुस्ती १९९३ मध्ये करून पंचायत राज व्यवस्थेत ५०% तर १०८ व्या घटना दुरुस्तीनुसार ३३% जागा महिलांसाठी राखीव आहेत. त्यामुळे १४.४% पर्यंत महिलांचे संसदेतील प्रतिनिधी वाढले.

**सारांश :-**

भारतात पुरातन काळापासून महिलांना आदिशक्ती मानून पूजनीय मानले जाते परंतु त्याच भारतात पुरुषप्रधान संस्कृतीच्या प्रभावाखाली कौटुंबिक व सामाजिक पातळीवर अनेक बंधने असल्याने देशातील अर्धी लोकसंख्या विकासाच्या मुख्य प्रवाहापासून वंचित आहे. देशाचा आर्थिक, सामाजिक, राजकीय व सर्वांगीण विकासासाठी महिला सक्षमीकरणाची गरज आहे. महिला सक्षमीकरणासाठी शासकीय संस्थात्मक व सामाजिक पातळीवरून प्रयत्न करण्यात आले. सक्षमीकरण प्रयत्नांना काही प्रमाणात यश मिळाल्यामुळे साक्षरता, आयुष्यमान, रोजगार, राजकारण यातील सहभाग वाढून महिला अनेक क्षेत्रात पुढे येत आहेत.परंतु आजही अपेक्षित प्रमाणात महिलांची स्थिती बदलेली नाही. विकासाच्या प्रवासापासून बहुसंख्या महिला वंचितच आहेत.

**संदर्भ ग्रंथ :-**

i. Sahay susma,1998, Why empower women? Women and empowerment approaches and strategies, discovery publication, new delhi, P.No.09.
ii. Ganeshmurthy V.S.,2007, 'women empowerment: Economic development and employment of women, new century publication, new delhi,P.No.18.
iii. Human development report 2019 P.No.308 to 315.
iv. Report of the high level committee on the status of women in india, government of india, ministry of woman and child department, new delhi. Jan 2015.
v. Cengua -2011
vi. European department report 2016 on women's empowerment and sustainable development.
vii. गुप्ता,कमलेशकुमार, २००५,'सामाजिक व्यवस्था में महिलाओं की स्थिती', बुक एन्क्लेव्ह, जयपूर,पु. क्र.४३ ते ४७.
viii. मुलांनी, एम.यू. २००६ 'महिला स्वयंसहाय्यता बचत गट', डायमंड पब्लिकेशन, पुणे, पृ. क्र.१९.
ix. https://en.m.wikipedia.org
x. https://sustainabledevelopment.un.org
xi. https://www.worldvision.org


Copyright© 2020
Scanned with OKEN Scanner